ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889

An International Peer Reviewed & Referred

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# शिक्षक शिक्षण समस्या

**प्रा. कामठे ए.जी.**

*सहाय्यक प्राध्यापक, जय श्रीराम कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड.) शिक्रापुर*

***Scholarly Research Journal's* is licensed Based on a work at *www.srjis.com***

## 'शिक्षक शिक्षण समस्या'

शिक्षणाची गुणवत्ता शिक्षकाच्या गुणवत्तेवर आधारित आहे. त्यामुळे एकुणचे शिक्षण प्रक्रियेत शिक्षण आणि पर्यायाने शिक्षक-शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या शिक्षणाच्या गुणवत्ता विकासासाठी एन.सी.टी.ई. , यु.जी.सी. विद्यापीठ, महाविद्यालये, संस्था, स्वतः अध्यापक प्रयत्नशिल असतात तरी सुद्धा शिक्षक- शिक्षणात अनेक त्रुटी आढळून येतात. त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात.या समस्या एन.सी.टी.ई., यु.जी.सी. विद्यापीठे आपल्यापरीने सोडविण्याचा प्रयत्न करतात. त्या समस्या खालील प्रमाणे-

**सर्वसामान्य समस्या :**

१. **शिक्षक शिक्षणाची प्रवेश प्रक्रिया :** यावर कायमस्वरुपी आक्षेप घेतला जातो की बी.एडसाठी प्रवेश घेणाऱ्याची गुणवत्ता कमी असते. उच्च गुणवत्ता असणारे विद्यार्थी अभियांत्रिकी, वैद्यकीय व्यवसायाकडे जातात.

२. **विद्यार्थी संख्या :** १०० विद्यार्थ्यांना पूर्णतः शासकीय गुणवत्ता यादी किंवा व्यवस्थापकीय गुणवत्ता यादीनुसारच प्रवेश दिला जातो.

३. **प्रवेश कोणास दिला जातो :** या १०० विद्यार्थ्यांमध्ये प्रवेश घेणारे अनुसुचित जाती, जमाती, भटक्या-विमुक्त जाती, संरक्षण सेवेतील अधिकाऱ्याची मुले, शिक्षकांची मुले, स्वातंत्र्य सैनिक, क्रिडा कौशल्या, परित्यक्तास्त्री, परप्रांतीक इ. प्रवेश पात्र समजले जाते.

४. **विद्यापीठ निहाय प्रवेश :** दिला जात असल्याने ज्या राज्यात बी.एड. करावयाचे त्या राज्यातील ७०% विद्यार्थी, त्याच राज्यातील परंतु भिन्न विद्यापीठातील २८% विद्यार्थी, २% विद्यार्थी इतर राज्यातील असतात.

५. **प्रवेशाची पात्रता :** अ मान्य पदवीधर, गुण ५% राखीव साठी ४५% इतर मागासस्वर्गीयांसह वर उल्लेख केल्याप्रमाणे प्रवेश देतांना राखीव जागा व गुण (उदा. एम.कॉम, एम.ए., एम.एस.सी. पदवीप्राप्तला गुणवत्तेप्रमाणे ५.४.३ गुण) देण्यात येतात.

वरील चार ही घटक (२ ते ५ ) प्रवेश प्रक्रियेत महत्त्वपूर्ण ठरतात. परंतु प्रवेशाची पद्धती मात्र सर्वत्र सारखी नाही. प्रत्येक राज्य व तेथील विद्यापीठे आपआपल्या नियमावल्या उपयोगात आणतांना दिसतात. सी.ई.टी. साठी खुलावर्ग व राखीव जागांसाठी अनुक्रमे १५ व १८ गुणांची आवश्यकता आहे.

६. **शिक्षक शिक्षणाचा उपलब्ध कालावधी :** शिक्षकी पेशासाठी/ व्यवसायासाठी आवश्यक कला- कौशल्यांच्या विकासासाठीचा हा कालावधी अपुरा पडतो.

७. **प्रात्यक्षिक कार्यातील अडचणी :** बी.एड. मधील महत्त्वाचे प्रात्यक्षिक म्हणजे सरावपाठ यासाठी महाविद्यालये पूर्णतः शाळांवर अवलंबून असतात. शाळा व महाविद्यालये यातील योग्य वैचारिक देवाणघेवाण अभावी शाळा संपूर्ण सहकार्य करण्यास असमर्थ ठरतात. त्यामुळे यशस्वीपणे पाठ पूर्ण करण्यात अडचणी निर्माण होतात.

८. **विषयज्ञानातील त्रुटी :** यामुळे पाठात यांत्रिकता येते. विद्यार्थी लक्ष देत नाही. त्यामुळे सरावपाठ दर्जेदार होत नाही.

९. **भाषण कौशल्याचा अभाव :** भाषण कौशल्याच्या अभावामुळे पाठ घेतांना आशय दर्जेदारपणे विद्यार्थ्यांसमोर मांडण्यास आमचे विद्यार्थी कमी पडतात. शिक्षक म्हटला की त्याच्याकडे भाषण कौशल्ये असायलाच हवे.

१०. **सराव पाठासंबंधी समस्या व उपाय :** माध्यमिक शिक्षणाच्या स्तरावर अध्यापक व्यवसाय स्विकारण्यासाठीची शैक्षणिक पात्रता म्हणजे बी.एड. ही व्यावसायिक पदवी प्राप्त करणे. बी.एड. अभ्यासक्रमातर्गंत सैंधातिक भागा बरोबरच प्रात्यक्षिक कार्याचे ही महत्त्वपूर्ण स्थान असते. ह्या भागात शिक्षकी व्यावसायास आवश्यक अशी कौशल्ये शिकविली जातात. ह्याच कौशल्यांचा आत्मसात करुन पुढे विद्यार्थी यशस्वी शिक्षक बनतात. एकुणच बी.एड. अभ्यासक्रम पूर्ततेतील व प्रात्यक्षिक कार्यातीलच गाभा म्हणजे विद्यार्थी शिक्षकांने पूर्ण करावयाचे सरावपाठ या होय.

प्रवेश प्राप्ती नंतर सूक्ष्म अध्यापन दरम्यान मिळणारे कौशल्यपाठ आत्मसात करुन त्याचे एकत्रित रुपांतरण सेतू आणि नंतर प्रत्यक्ष वर्ण अध्यापनात करावयाचे असते. सुक्ष्मअध्यापना दरम्यान प्राप्त केलेल्या कौशल्य प्रत्यक्ष वर्ण अध्यापनात उपयोग सराव पाठ होतांना होत असतो. सराव पाठ दरम्यान अध्यापनात असणाऱ्या उणीवा पाठ निरीक्षका मार्फत शेऱ्याच्या व सूचनांच्या माध्यमातून लगेच दुरुस्त होत असल्याने सराव पाठांचे स्वतःचे असे एक महत्त्वपूर्ण स्थान आहे. म्हणून सराव पाठांना बी.एड. अभ्यासक्रमाचा 'आत्मा' असे संबोधले जाते ते योग्यच आहे.

**नव्याने निर्माण झालेल्या समस्या :**

१. विनाअनुदानित महाविद्यालयांची निर्मिती :

ही एक मोठी समस्या निर्माण झाली आहे. कारण अशा महाविद्यालयांची संख्या दिवसेंदिवस वाढतच गेली आणि त्यामुळे पात्रता आणि गुणवत्ता या दोन्ही समस्या निर्माण झाल्या. कारण अशा महाविद्यालयांना मान्यता तर प्राप्त झाली परंतु आवश्यक त्या भौतिक सोयी आणि सुविधा पुरविण्यात ही महाविद्यालये यशस्वी ठरली नाही.

२. **पात्र प्राचार्यांच्या नेमणुकीचा प्रश्न :** निर्माण झाला कारण अशा महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर सेवानिवृत्त व्यक्तिची नेमणुक करण्यात आली. त्यांना दिले जाणारे वेतन व काम यात तफावत निर्माण झाली.

३. **अध्यापक नेमणूकीच्या समस्या :** विनाअनुदानित महाविद्यालयांची संख्या वाढल्यामुळे तेथे काम करणाऱ्या पात्र अध्यापकांचा प्रश्न निर्माण झाला. कारण मुळातच पात्र अध्यापकांची कमतरता आणि पात्रता असतांना कमी वेतन का घ्यावे ? अशी द्विधा मनःस्थिती अध्यापकांची निर्माण झाली. परिणामतः पात्रता धारकांअभावी उपलब्ध अध्यापकांच्या नेमणुकीला पर्याय उरला नाही.

४. **फी संबधीची समस्या :** विनाअनुदानित महाविद्यालयांची फी मुळातच अनुदानित महाविद्यालयांपेक्षा अधिक असावी हे विद्यापीठानेच मान्य केलेले असल्याने विद्यापीठ मार्फत अनुदानित महाविद्यालयात प्रवेश घेण्यास विद्यार्थी उत्सुक असतात. त्यामुळे या महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संदर्भात फी चर्चा समस्या निर्माण होणे स्वाभाविक आहे.

५. **अध्यापकांच्या सेवेचा प्रश्न :** विनाअनुदानित महाविद्यालयाची संख्या बेसुमार वाढल्यामुळे बी.एड. होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढले. परंतु सर्वांना नोकरी नाही त्यामुळे अध्यापकांच्या बेरोजगाराच्या समस्या निर्माण झाली. आवश्यकते पेक्षा अधिक अध्यापक निर्माण झाल्याने निरंतर शिक्षणाची सोय नाही, विनाअनुदानित शाळांमध्ये कमी वेतनावर काम करणे इ. कारणांमुळे शिक्षक– शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलल्यास आश्चर्य वाटू नये.

**सर्वसमावेशक शिक्षणासंबधीत समस्या :**

**मुख्य प्रवाह :**

नियमित शाळांमध्ये बालकांना समावून घेणे म्हणजे मुख्यप्रवाहात सामावून घेणे होय. मुख्य प्रवाह हा एक दृष्टीकोन असून तो एकात्मता ला अधिक महत्त्व देतो.

अर्थात अलिकडच्या स्वतंत्र शाळा बालकांना विलग ठेवण्यावर जास्त भर देतात. (विशेषशाळा) त्यांच्या एकदम विरुद्ध विचार होय.

म्हणजेच कमीत कमी नियंत्रित वातावरणात अपंग बालकांना ठेवणे म्हणजे मुख्य प्रवाह होय. याचा अर्थ असा नाही की

अपवादात्मक बालकांना सर्वसामान्य मुलांच्या वर्गात बसविणे. ह्याचा अर्थ!

दृष्टीकोन असा की नियमित वर्गातून त्यांच्या गरजा भागविणे हा आहे. म्हणजे दिवसातून अर्धवेळ किंवा काही तास असे वातावरण उपलब्ध करुन देणे होय. येथे कदाचित ह्यात ज्यात अभ्यासवर्गाची सोय असेल.

अभ्यासपुरक कार्यक्रम असतील इ.

**एकात्मक म्हणजे**

- ही संज्ञा अपंगांसाठी असलेल्या सुविधांच्या बाबतीत वापरली जाते.
- अपंग व्यक्तींना मिळणाऱ्या सर्व सुविधांचे यशस्वीरित्या समन्वय म्हणजे एकात्मता होय.
- अपंगत्वाची लवकर ओळख करणे आणि त्यांची शालेय कार्यक्रमात, समाजात, नोकरीविषयी, राहण्याविषयी (घर,समाज) मध्यस्थी करणे.
- विशेष बालकांच्या एक किंवा एकापेक्षा जास्त गरजा विचारात घेवून त्यात परिणामकारक समन्वय साधणे होय.
  उदा. कर्णबधीर मुलांनी सर्वसामान्य मुलांबरोबर शिक्षण घेणे.

**एकात्मता ही–** भौतिक गोष्टी, सामाजिक, शैक्षणिक वातावरण यात साधावयाची असते त्यादृष्टीने शाळेची योजना आखावयास हवी. म्हणजे कोणताही विशेष कार्यक्रम हा नियमित शाळांमध्ये/ वातावरणात असायला हवा. यामध्ये–

१. विशेष गरजा असणाऱ्या वि. ना .सर्वसामान्य मुलांच्या शाळांमध्ये विशेष सेवा पुरविणे.
२. सर्वसामान्य आणि विशेष गरजा असणाऱ्या वि. ना एकच वेळापत्रक.
३. अशा वि.ना विविध शैक्षणिक वर्गात सामावून घेणे आणि शक्य तितक्या अभ्यासपूरक कार्यक्रमात सहभाग उदा. संगीत, कला, क्षेत्रभेट इ. असावा.
४. सर्वसामान्य वि.ना. मिळणाऱ्या सुविधा अशा वि.ना. ही मिळणे.
५. दोघांना एकाच वातावरणात शिक्षण घेता यावे यासाठी अशा प्रकारे शिक्षणाची आखणी करणे.
६. पालकांचा सहभाग वाढविण्यावर भर देणे.
७. सर्वसामान्य मुलांच्या शाळेत अशा मुलांची नोंदणी करुन पुरेसे वैयक्तिक आणि सामुहिक कार्यक्रम आखणे.

हे करण्यासाठी प्रशिक्षित शिक्षकांची गरज आहे. परंतु ६४–६६– शिक्षण आयोगाच्या मते

**समस्या –**

१. प्रशिक्षीत शिक्षकांचा अभाव– प्रत्येक जिल्ह्यात एक संस्था असावी.
२. आर्थिक मूलस्त्रोतांचा अभाव – इतर शिक्षण क्षेत्रांप्रमाणे अपंगांच्या शिक्षणासाठी सरकार पुरेसा पैसा उपलब्ध करुन देऊ शकत नाही.
३. अपंगाच्या शिक्षणाच्या एकात्मतेच्या समस्या
४. गरजानुरुप कार्यक्रमांची गरज
५. संशोधनाचा अभाव.

**यासाठी–**

१. शिक्षकांच्या व्यापक सेवांतर्गत कार्यक्रमात अपंग शिक्षणाचा समावेश करावा.
२. प्रशासक अधिकाऱ्यांसाठी उद्बोधन वर्ग आखावे.
३. दूरशिक्षणाच्या माध्यमातून पूरक कार्यक्रमांचे आयोजन करावे.
४. अपंग मुलांना शिकविणाऱ्या शिक्षकांना योग्य मार्गदर्शन व्हावे.
५. तज्ज्ञ व्यक्तींची संख्या वाढवावी.
६. सामान्य शाळांतून अपंग मुलांसाठी व्यवसायपूर्व व व्यवसायपूर्ण अभ्यासक्रमांच्या ज्यादा सोयी व उपकरणे उपयोगात आणावी.
७. जिल्हा स्तरावर अपंगांचे अचूक निदान करण्यासाठी मनोविकास तज्ज्ञांच्या सेवेत वाढ करावी.
८. या कार्यासाठी या कामाशी संबंधित व्यक्तींच्या प्रशिक्षणाचा व्यापक कार्यक्रम हाती घ्यावा.

हे काम विशेष शिक्षकांना– मनुष्यबख विकास व मानवी साधनसंपत्ती मंत्रालय, समाज कल्याण मंत्रालय, विद्यापीठ अनुदान आयोग, राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान प्रशिक्षण परिषद, राष्ट्रीय अपंग संस्था, विद्यापीठातील विशेष शिक्षण विभाग, शिक्षक प्रशिक्षणा बरोबरच मनोविकारतज्ज्ञ व डॉक्टर्स यांचे ही उद्बोधन व्हावे.